**वॉक - इन - इंटरव्हयु**

**महाराष्ट्र शासन**

विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

**कार्यालयाचा पत्ता :-** विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद साई ट्रेड सेंटर, पहिला मजला, महापौर बंगल्या शेजारी, रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद

महाराष्ट्र शासन निर्णय, गृह विभाग क्र. एमआयएस-3614/प्रक्रं-13/पोल-3 दिनांक 10/09/2014 अन्वये प्राधिकरणाचे कार्यालयासाठी कार्यालयीन अधिकारी / कर्मचारी यांची पदे मंजुर केलेली आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन, शासण निर्णय क्रमांक संर्कीण -2715/प्र.क्र.100/13 दिनांक 17/12/2016 मधील तरतुदीनुसार प्राधिकरणाची खालील नमूद मंजूर पदे ही सेवानिवृत्त राजपत्रित वर्ग-ब मधुन भरावयाची आहे. अशा सेवानिवृत्त कार्यालयीन अधिकारी यांचे मधुन कार्यालयाचे विवक्षीत कामकाज करणेसाठी एक वर्षाचे कालावधीसाठी करार पध्दतीनुसार भरावयाची आहेत.

गट-ब अधिकारी यांची प्राधिकरणाचे कार्यालयीन कामकाज करणेसाठी नियुक्ती करावयाची आहे. सामान्य प्रशासन, शासण निर्णय क्रमांक संर्कीण -२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७/१२/२०१६ मधील परिशिष्ट - अ मध्ये नमुद प्रमाणे मासिक परिश्रमिकाची व भत्यांची परिगणना करण्यात येईल.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | मुलाखतीचा दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | प्रशासकिय अधिकारी | 1 पद | 20/03/2023 |
| 1 | उच्च श्रेणी लघुलेखक | 1 पद | 20/03/2023 |
| 2 | निम्न श्रेणी लघुलेखक | 1 पद | 20/03/2023 |
| 3 | वरिष्ट श्रेणी लिपीक | 1 पद | 20/03/2023 |
| 4 | लिपीक टंकलेखक | 2 पदे | 20/03/2023 |

**प्रशासकिय अधिकारी / वरिष्ट श्रेणी लिपीक / लिपीक टंकलेखक**
**या पदासाठी पात्रता व अनुभव**

१) पत्रव्यवहार शाखा, विभागीय चौकशी व लेखा शाखा देयके तयार करुन कोषागारात सादर करणे, टंकलेखन करणे इत्यादी कार्यालयीन कामकाजाचा अनुभव असणारे व शासकीय सेवेतून राजपत्रित वर्ग-ब पदावरुन सेवानिवृत्त झालेले कार्यालयीन अधिकारी वॉक - ईन - इंटरव्हयु साठी पात्र ठरतील. त्यांची टंकलेखनाची प्रत्यक्ष टंकलेखन चाचणी घेण्यात येईल. वॉक - इन - इंटरव्हयु करीता **बैठक हॉल, पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद शहर** येथे दिनांक २०/०३/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता स्वखर्चाने समक्ष हजर रहावे.

२) वि.पो.त.प्रा., औरंगाबाद विभाग, औरंगाबाद या कार्यालयात यापुर्वी काम केलेले परंतु त्यांची सेवा समाप्त करण्यात आली, अगर त्यांना मुदत वाढ नाकारण्यात आली असेल, असे अधिकारी / कर्मचारी मुलाखतीस पात्र राहणार नाही.

**उच्चश्रेणी लघुलेखक/ निम्नश्रेणी लघुलेखक पदासाठी पात्रता व अनुभव**

१) गट -ब राजपत्रित पदावरुन सेवानिवृत्त झालेले, मराठी लघुलेखनाचा वेग १२० श.प्र.मि. व टंकलेखन ४० श.प्र.मि. व इंग्रजी लघुलेखनाचा वेग १०० श.प्र.मि. व टंकलेखन ४० श.प्र.मि., त्यांची प्रत्यक्ष टंकलेखन चाचणी घेण्यात येईल.

२) करार पध्दतीने नियुक्ती करण्यात येणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांना महाराष्ट्र शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-२७१५/प्रक्र १००/१३, दिनांक १७/१२/२०१६ मधील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

३) उमेदवारांचे वय दिनांक २०/०३/२०२३ रोजी ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

मुलाखतीच्या दिवशी दिनांक २०/०३/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. स्वपरिचय (बायोडाटा), पासपोर्ट साईज -०३ फोटो, कोणतेही शासकिय ओळखपत्र, सेवानिवृत्त झाले बाबत पीपीओ ची मुळ कागदपत्रे व इतर प्रमाणपत्रांसह वॉक - ईन - इंटरव्हयु साठी पात्र ठरतील.

४) वॉक - ईन - इंटरव्हयु करीता **बैठक हॉल, पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद शहर** येथे स्वखर्चाने समक्ष दिनांक २०/०३/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता हजर रहावे.

(अपर्णा गिते)
पोलीस उप आयुक्त (मु.), औरंगाबाद शहर तथा
सदस्य, विभागीय पोलीस तक्रार प्राधीकरण कार्यालय,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद